# पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा

**सातारा तालुका पोलीस ठाणे जि.सातारा**

**फोन नं.०२१६२-२३८६०७**

**Email id-**

**sataratps.satara@mahapolice.gov.in**


---

## प्रेसनोट दिनांक- २८/११/२०२५

## जिवे मारण्याचा प्रयत्न करणा-या मुख्य आरोपीस ०५ वर्षे शिक्षा व इतर आरोपींना ०१ वर्ष शिक्षा

सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दितील मौजे कोंडवे नलवडे आळी,ता.जि.सातारा येथे दि.२७/१०/२०१७ रोजी रात्रौ २१.०० वा.चे.सुमारास आरोपीत यांच्या नातेवाईकामधील मुलीचे फिर्यादी च्या पुतण्या सोबत प्रेम प्रकरण असल्याच्या संशयावरून यापुर्वी भांडणे झालेली होती. सदर बाबत फिर्यादींचा चुलत भाऊ विशाल इंगळे यांनी पोलीस ठाण्यास तक्रार देण्यास सांगितलेच्या कारणावरून गुन्ह्यातील आरोपींनी चिडून, जाऊन बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी तसेच यातील जखमी विशाल इंगळे व इतर साथीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून यातील जखमी विशाल इंगळे यास ठार मारण्याच्या उद्देशाने लाकडी दांडके व लोखंडी गज डोक्यात घालून गंभीर जखमी केले आहे म्हणून वगैरे तक्रारीवरुन सातारा तालुका पोलीस ठाणेस गु.र.नं.४२१/२०१७ भा.द.वि. सं.क.३०७,३२३,१४३,१४७,१४८,१४९ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला होता. नमुद गुन्ह्याचा तपास तत्कालिन तपासी अधिकारी श्री.स्वराज पाटील पोलीस उपनिरीक्षक सातारा तालुका पोलीस ठाणे यांनी करुन नमुद गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केलेले होते.

सदरचा खटला हा मा.श्री.अरविंद शं.वाघमारे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश सो,सातारा यांचे न्यायालयात चालला होता. सरकार तर्फे मा.श्री.एम.एन.कुलकर्णी जिल्हा सरकारी वकील सातारा यांनी सदर खटल्याचे कामकाज पाहिले नमुद केसमध्ये एकुण १० साक्षीदार तपासणेत आले. परिस्थितीजन्य पुरावा व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच अन्य साक्षीदारांचे साक्षीवरुन मा.जिल्हा सरकारी वकील यांचा युक्तीवाद व आरोपींनी केलेल्या कृत्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय सो, व मा.उच्च न्यायालय सो,यांचे वेळोवेळीचे न्यायनिवाडे व न्यायालयाचे समोर सादर केलेले पुरावे ग्राह्य मानुन मा.न्यायाधीश सो,श्री.अरविंद वाघमारे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश सो,सातारा यांनी दि.२७/११/२०२५ रोजी यातील आरोपी नामे-योगेश कृष्णात निंबाळकर यास भा.द.वि.सं.क.३०७ प्रमाणे ०५ वर्षांची सक्त मजुरी व ३,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०२ महिणे साधी कैद तसेच आरोपी नामे संतोष यदु निंबाळकर व गणेश शंकर निंबाळकर यांना भा.द.वि.सं.क.३२३ अन्वये दोघांना ०१ वर्षे शिक्षा व २,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे.

मा.श्री.तुषार दोषी सो,पोलीस अधीक्षक सातारा, मा.डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, मा.श्री.राजीव नवले उपविभागीय पोलीस अधिकारी सो,सातारा शहर विभाग व मा.श्री.निलेश तांबे पोलीस निरीक्षक सातारा तालुका पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन महिला पोलीस हवालदार शितल भोसले ब.नं.१९००, व महिला पोलीस हवालदार तेजा तुपे ब.नं.१३६९ सातारा तालुका पोलीस ठाणे यांनी कामकाज पाहिले आहे.

सदर खटल्याचे कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा व उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा शहर विभाग,सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

**पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मान्यतेने**

**प्रति,**

**सर्व वृत्त संपादक सातारा**

**सर्व मिडिया प्रतिनिधी सातारा**